वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे कार्यालय

विषय :- 'लोखंडी कपाट/अलमारी व टेबल' खरेदी करणेकरीता दरपत्रक मागविण्याबाबत.

जिल्हा न्यायालय, वाशिम या न्यायिक जिल्ह्यातील न्यायालयांकरीता दस्तऐवज ठेवण्याकरीता पाच कप्पे व लॉक असलेले २० व २२ गेज (प्रत्येक कपाटाची साईज ७८ x ३६ x १९) चे एकुण ४५ लोखंडी कपाट/अलमारी व एकुण १० टेबल (साईज ३ X ४) खरेदी करण्याकरीता महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ तसेच स्थानिक बाजारपेठेतुन खरेदी करण्याकरीता खालील अटी व शर्तींवर दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

१. खरेदी केलेल्या वस्तुचा पूरवठा, आदेश दिल्यापासून १५(पंधरा) दिवसांचे आत करणे बंधनकारक राहील.

२. खरेदी करण्यात आलेल्या वस्तूंचा पूरवठा हा जिल्हा न्यायालय, वाशिम तसेच तालुका न्यायालय येथे करणे बंधनकारक राहील.

३. पुरवठा करण्यात आलेल्या वस्तुंमध्ये काही त्रुटी आढळल्यास सदरच्या त्रुटी असलेली/असलेल्या वस्तू तात्काळ बदलवून देणे अनिवार्य राहील.

४. खरेदी केलेल्या वस्तुंचे देयकाचे प्रदान हे अदाता नोंदणी पदध्तीद्वारे सरळ अदात्याचे बॅक खात्यात जमा करण्यात येईल.

दरपत्रक धारकाने वरीलप्रमाणे पाच कप्पे व लॉक असलेले २० व २२ गेज (प्रत्येक कपाटाची साईज ७८ x ३६ x १९) चे एकुण ४५ लोखंडी कपाट/अलमारी व एकुण १० टेबल (साईज ३ X ४) महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ तसेच स्थानिक बाजारपेठेतुन खरेदी करणेकरीता आपले दरपत्रक सर्व कर, किंमती व अटीसह दिनांक ०८/०२/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे नांवे या कार्यालयास बंद लिफाफयामध्ये सादर करावे. तसेच बंद लिफाफयावर **'लोखंडी कपाट/अलमारी व टेबल' खरेदी'** खेरदी असे ठळक अक्षरात नमुद करावे.

तसेच प्राप्त झालेले दरपत्रके कोणतेही कारण न दाखविता नामंजूर करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांना राहील.

आदेशावरून,

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, वाशिम.

दिनांक : ३१/०१/२०२६